राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
[जि]ल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली
रजि. नं. महाराष्ट्र/६८२/२००५, सांगली

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

पत्ता :- जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली
फोन नं. :- ०२३३ - २३७४८१७,
फॅक्स नं. :- ०२३३ - २३७४८१७
Emai Address :- cssangli10.@gmail.com

जा.क्र.आरोग्य/वाहन दरपत्रक/ 708 /२०२६
जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, सांगली.
दिनांक - 30 /06/२०२६

प्रति,

०१८

.........................................

.........................................

**विषय** :- जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, सांगली अंतर्गत राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांकरीता (NCD) वाहन पुरवठयाबाबत दरपत्रके मागणी...

उपरोक्त विषयास अनुसरुन जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, सांगलीमार्फत राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमासाठी अधिकारी / कर्मचारी क्षेत्रीय भेटीसाठी ऑन कॉल बेसीस प्रति दिन वाहन भाडेतत्वावर मारुती इरटिका/तवेरा/स्वीप्ट डिझायर/इटीऑस अगर तत्सम स्वरुपाचे वाहन आवश्यक आहे.

तरी सदर वाहनाचा पुरवठा करणेबाबत सोबत जोडलेल्या अटी व शर्तींचे अधिन राहून आपणांकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत. सदर दरपत्रके बंद लखोटयातून दिनांक 07/07/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली यांना राहतील.

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | आवश्यक वाहने | ऑन कॉल बेसेस वाहन भाडे |
|---|---|---|---|
| १ | ऑन कॉल बेसीस प्रति दिन वाहन भाडेतत्वावर - मारुती इरटिका/तवेरा/स्वीप्ट डिझायर/इटीऑस अगर तत्सम स्वरुपाचे | ०१ - वाहन | प्रति दिन प्रति वाहन फिरतीसाठी इंधन, वाहनचालक, वाहन देखभाल दुरुस्तीसह ठोक रक्कम रुपये - |
| ● दरपत्रक -२ लिफाफा पध्दतीने द्यावीत - लखोटा क्र. १ (कागदपत्रे) लखोटा क्र. ०२ (आर्थिक) ● | | | |
| ● सोबत दरपत्रके मागणी - सविस्तर अटी व शर्ती ● | | | |

०१८

(डॉ. विक्रमसिंह भा. कदम)
जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली

## • ऑनकॉल बेसेस वाहन – नियम, अटी व शर्ती •

१. वाहनाच्या भाडयाचे दर करारनाम्याच्या दिनांकापासून दि.    /    /२०२६ ते दि.३१/०३/२०२७ या कालावधी करीता मान्य राहतील. या कालावधीमध्ये दरात कोणत्याही कारणास्तव बदल होणार नाही.

२. **पुरवठा केले जाणारे वाहन जानेवारी, २०२० नंतरच्या बनावटीचे असावे. जानेवारी, २०२२ नंतरच्या बनावटीचे वाहनास प्राधान्य दिले जाईल.**

३. मोटार वाहन कायदा सन १९८८ मधील तरतूदी प्रमाणे वाहनाची सर्व प्रमाणपत्रे वैध असावीत.

४. वाहनाचा केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या तरतूदीनुसार परिवहन संवर्गातील म्हणजेच प्रवासी वाहतूक परवाना कागदपत्रे वैध असणे आवश्यक आहे.

५. मुंबई मोटार वाहन कायदयाप्रमाणे वाहनाच्या सर्व प्रकारच्या कराची रक्कम भरलेली असावी.

६. वाहनाचा थर्डपार्टीसह पूर्ण विमा कायम उतरविलेला असावा.

७. वाहन पुरवठा धारकाने नियमानूसार पी.यु.सी.वैध प्रमाणपत्र वाहनासोबत ठेवावे.

८. वाहनाचा सर्व कर भरणा केला असलेबाबत व आवश्यक परवाने अद्ययावत असलेबाबतचे संबंधित कागदपत्रे नेहमी वाहन चालकासोबत असणे आवश्यक आहे.

९. वाहन चालकाजवळ वाहन चालविण्यासाठी प्रचलित कायदयानूसार वैध अनुज्ञप्ती असावी

१०. कार्यालयाने मागणी केलेस, वाहन चालकांच्या एकंदरीत वर्तणूक व चारित्र्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकावर राहील.

११. ऑन कॉल बेसिस वाहन कॉल दिवशी वापरात असतांना वाहन चालकाला कोणताही अतिरीक्त भत्ता तसेच चहा/नाष्टा/जेवण दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२. वाहन पुरवठा दाराने अटी व शर्ती प्रमाणे वाहन न पुरविण्यास किंवा त्या नंतर अन्य कोणत्याही अटी अथवा शर्तीचा भंग केल्यास संबंधित वाहन धारकास सात दिवसाची पूर्व सूचना देवून करार रद्द करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांनी राखून ठेवला आहे. वाहन कर्तव्यावर असताना नादुरुस्त/खराब झालयास त्वरीत त्याचप्रकारचे बदली वाहन पूरविण्याचे व्यवस्था वाहन पुरवठादारांनी करावी लागेल.

१३. वाहन पुरवठादाराने निर्धारीत केलेल्या कर्तव्यासाठी वाहनाचा पुरवठा न केल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी निर्धारीत करतील तो दंड अधिक वाहन बाजारातून भाडयाने घेण्यात येईल व त्यास जादा भाडे दयावे लागल्यास अश्या जादा भाडयाची वसूली वाहन पुरवठादाराकडून वसूल करण्यात येईल.

१४. वाहन वापराबाबतची दैनंदीन अधिकृत माहिती कार्यालयीन सूचनेनूसार (उदा.दिनांक, फिरतीचे ठिकाण, वेळ, वापर,कि.मी. इ.) नियमितपणे कार्यालयास लेखी सादर करणे अनिवार्य राहील.

१५. वाहन कर्तव्यावर, असताना अपघात झाल्यास व वाहनातील प्रवाशास इजा,दुखापत,मृत्यू झालेस किंवा त्या अनुषगाने होणारा सर्व खर्च/नुकसान भरपाई वाहन पुरवठादाराने देणे बंधनकारक राहील.

१६. वाहन भाडयाच्या देयकाच्या रक्कमेतून नियमानूसार अनुज्ञेय होणारा आयकर व त्यावरील अधिभार आहरण व संवितरण अधिकारी ( Drawing and Disbursing Officer) यांचे स्तरावरुन वसूल केला जाईल.

१७. वाहन सुस्थितीत असलेबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. कराराच्या दरम्यानच्या काळात वाहनाच्या भागांची (टायर,ल्यूब्रिकेटस,डिझेल) किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढवले जाणार नाहीत/तशी मागणीही करता येणार नाही या बाबतचा अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचा राहिल.

१८. वाहनास संगणकिय ओडोमीटर असणे आवश्यक आहे.

१९. लखोटा क्र. २ (आर्थिक) नमुन्यातील भरणेत आलेले निविदाधारकांचे दर हे प्रति वाहन फिरतीसाठी इंधन, वाहनचालक, वाहन देखभाल दुरुस्तीसह ठोक भरलेली रक्कम ही प्रति दिन ३०० कि.मी. मर्यादे पर्यंतच्या फिरतीसाठी बंधनकारक राहील.

२०. वाहनाची फिरती प्रति दिन ३०० कि.मी. मर्यादेपेक्षा जास्त झालेस आर.टी.ओ. नियमानुसार मंजूर दरप्रमाणे ३०० कि.मी. वरील जादा फिरतीचे देयक अदा केले जाईल.

२१. निधी उपलब्धेतेनूसार वाहनाची देयके अदा केली जातील.

२२. वाहन पुरवठा दाराने निविदेमध्ये नमूद व उपलब्ध करुन दिलेलेच वाहन निविदा कालावधीकरीता उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. सामान्य परिस्थीतीमध्ये अन्य बदली वाहन स्विकारले जाणार नाही.

२३. करारामध्ये उदभवणा-या कोणत्याही विवादास्पद मुदयांवर अंतिम निर्णय देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांना राहतील. कोणतेही कारण न देता प्रस्तूत करार रद्द करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना राहिल.

२४. वाहनाची फिरतीवेळी अधिकारी यांनी वातानुकुलर (ए.सी.) लावणेची मागणी केलेस तो सुरु ठेवणे वाहन पुरवठादारास बंधनकारक राहील.

२५. वाहन पुरवठादार यांनी निवेदेमधील अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे करारपत्रक रक्कम रुपये १००/- च्या कोर्ट फी स्टॅम्पवर सादर करणे बंधनकारक आहे.

२६. वाहनाची दुरुस्ती, टायर, टयुब, रिपेअरी, ऑईल बदली व इतर आवश्यक वाहनाचा खर्च हा सर्व वाहन पुरवठादाराने करावयाचा असुन त्याबाबत कोणताही खर्च / भरपाई देय राहणार नाही.

२७. वाहनाची फिरती - पुणे, मुंबई व इतर ठिकाणी शासकीय कामासाठी फिरती वेळी देय असणारा टोल (वाहतूक कर) हा या कार्यालयाकडून अदा करणेत येईल.

२८. क्षेत्रीय भेटींकरीता एकाच दिवशी एकापेक्षा जास्त वाहनाची आवश्यकता भासलेस मारुती इरटिका/तवेरा/स्वीप्ट डिझायर/इटीऑस अगर तत्सम स्वरुपाचे पर्यायी/अतिरिक्त वाहन उपलब्ध करुन देणेची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

जिल्हा शल्य चिकित्सक,
सांगली

# जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, सांगली

## लखोटा क्र. १ (कागदपत्रे) तांत्रिक

### लखोटा क्रं.१ मध्ये खालील कागदपत्रे समाविष्ट करावीत

१) वाहनांच्या आर.सी.टी.सी./ कर पुस्तकाची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

२) वाहनाचा केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या तरतूदीनुसार परिवहन संवर्गातील म्हणजेच प्रवासी वाहतूक परवाना साक्षांकित झेरॉक्स प्रत.

३) वाहनाचा पूर्ण विमा भरलेच्या पॉलीसीची साक्षांकित झेरॉक्स प्रत.

४) वाहन चालकाचा वाहन चालविणेचा परवाना साक्षांकित झेरॉक्स प्रत.

५) अटी व शर्ती मान्य असलेबाबत अटी व शर्तीचे झेरॉक्स प्रत निविदाधारकांने स्वाक्षरीसह लखोटा क्र. १ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.

# जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, सांगली

## लखोटा क्र. २ (आर्थिक)

## आर्थिक निविदा भरण्याचा नमूना खालीलप्रमाणे

## • ऑनकॉल बेसेस वाहन •

| वाहनाचा प्रकार (कंपनीचे नाव) | वाहन नोंदणी क्रमांक व खरेदी दिनांक | ठोक रक्कम प्रति दिन |
|---|---|---|
| | | प्रति दिन ( ३०० कि.मी.पर्यंत) प्रति वाहन फिरतीसाठी इंधन, वाहनचालक, वाहन देखभाल दुरुस्तीसह ठोक रक्कम रुपये - ........... |

दिनांक :-

ठिकाण :-

वाहन पुरवठादार यांची स्वाक्षरी

संपुर्ण नाव :-

पत्ता :-

मोबाईल नंबर :-